# फिरता डोळयांच्या दवाखान्याचे उदघाटन

प्रतिनिधी

कर्जत, दि. ३०: डॉ. हळदीपूरकर यांच्या लक्ष्मी चॅरिटेबल ट्रस्टच्या फिरता डोळयांचा दवाखान्याचे उदघाटन कर्जत तालुक्यातील कोंढाणे येथे करण्यात आले. रायगड जिल्हयातील पनवेल, पेण, रोहा, कर्जत, पाली, या तालुक्यात सुध्दा हा दवाखाना फिरणार आहे. त्यामुळे गरीब, गरजुंची सोय होणार आहे.

सुनिल गोगटे मित्र मंडळ आणि परिवार यांच्यावतीने कर्जत तालुक्यातील कोंढाणे येथील योगेश्वरी मंदिरांच्या आवारत या फिरता डोळयांचा दवाखाना गाडीचे उद्घाटन आमदार सुरेश लाड यांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी मोहन हिंदूपूर, सचिन भूमकर, प्रभाकर आसवले आदी उपस्थित होते. सुनिल गोगटे यांनी उपस्थितांचे स्वागत केले. डॉ शशिक्रांत देसाई यांनी प्रास्ताविक केले. याप्रसंगी आमदार लाड म्हणाले कर्जत तालुका दुर्लक्षित भाग आहे. या भागात लोकांना डोळे तपासणीसाठी मुंबई,पुणे, पनवेल आदी ठीकाणी जावे लागते मात्र डॉ हळदीपूरकरांच्या फिरता डोळयांचा दवाखान्यामुळे ती सोय गावा - गावा मध्ये होणार आहे. चांगले काम करीत असताना सुध्दा दुषित नजरेने पाहीले जाते ही दृष्टी बदलली पाहीजे. फि रता दवाखाना सुरु करणे सोपे आहे मात्र चालविणे कठीण आहे या माध्यमातून दृष्टी देण्याचे काम होणार आहे असे सांगितले.

डॉ. राहुल अचलेकर यांच्या मार्गदर्शनाखाली रोहन दांडेकर,निर्मल देबनाथ यांनी तपासणी केली. या फिरत्या गाडीत अत्याधुनिक सुविधांनी युक्त डोळयांचा सर्व प्रकारच्या तक्रारीचे निवारण करण्यात येणार आहे. श्रीमती शांता वर्टी आणि श्रीमती सुनिता मोईत्रा यांच्या स्मरणार्थ मोहन व स्निग्धा वर्टी व्हिडिसी लंडन यांच्यातर्फे ही गाडी भेट देण्यात आली आहे.




अशी माहीती सचिन भूमकर यांनी दिली. याप्रसंगी बबन गायकवाड, अनिल गोगटे, दत्तात्रेय क्षिरसागर, मारुती चव्हाण,विनायक गोगटे किशोर वैद्द, महेंद्र कांबळे, अभय गोगटे, सिंधु वरे, सुलोचना गोगटे, सुमन क्षिरसागर,अश्विनी गोगटे, अक्षय गोगटे आदीसह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.